क्रमांक : २३०३९ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : १८ नोव्हेंबर, २०२२

:: **कार्यालयीन आदेश** ::

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संदर्भात या सचिवालयाच्या कामकाजामध्ये अधिकतम पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण होण्याच्या दृष्टीने माहिती अधिकार कायद्यानुसार विधानमंडळ सचिवालयाच्या नियंत्रणाखालील माहिती विहित वेळेत नागरिकांना उपलब्ध व्हावी, यासाठी माहिती अधिकारांतर्गत प्राप्त होणारे अर्ज स्विकारण्याकरिता मंत्रालयीन स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या (Online RTI) ऑनलाईन कार्यप्रणालीप्रमाणे विधानमंडळ सचिवालयात देखील माहिती अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्याकरीता या सचिवालयाच्या संकेतस्थळावर स्वतंत्र पोर्टल (Online RTI Portal) निर्माण करण्यात येत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत Online RTI संदर्भातील कामकाजाकरीता माहिती अधिकारी (समन्वय) म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव (समिती) यांची 'नोडल अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**( मोहन काकड )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
२) श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव (समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
३) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
४) वैयक्तीक नस्ती
५) निवडनस्ती